Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PARIKALPANA

K-37, Ajit Vihar, Delhi-110084
Mo: 9968084132, 7982062594
e-mail: parikalpana.delhi2016@gmail.com

Book : Development of Public Administration in India
Editors : Dr. B. R. Katturwar, Dr. Urmila Reddy
Dr. Dattatraya Kharatmol

© Editors

Edition : 2024

Price : 795/-

ISBN : 978-93-95104-98-2

Printed at Compact Printers, Delhi-110 032 in India.

*To publish this book by any means and to perform theatrical it is mandatory to get written permission from the publisher.*

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# 47. भारतीय प्रशासनावरील माहिती अधिकाराचा प्रभाव

प्रा.डॉ. मुक्ता सोमवंशी
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय प्रशासनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सुरुवातीपासूनच प्रयत्न केल्याचे दिसून येते. ए.डी. गोरेवाला समिती, संथानाम समितीच्या माध्यमातून भारतीय प्रशासनामध्ये सुव्यवस्थितपणा आणण्याचा प्रयत्न झाला. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय प्रशासनामधील त्रुटी दूर करून शिस्त निर्माण करण्याच्या अनुषंगाने सुधारणा करण्याचा विशेष प्रयत्न केला. यासाठी त्यांनी पी. एच. ॲपलबी या अमेरिकन प्रशासकीय विचारवंतास आमंत्रित केले. पी. एच. ॲपलबी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली. या समितीला भारतीय प्रशासकीय यंत्रणेचा अभ्यास करून आवश्यक त्या सुधारणा सुचविण्याविषयी सांगण्यात आले. या समितीने भारतीय प्रशासकीय यंत्रणेचा परिपूर्ण अभ्यास करून अनेक समस्यांचा शोध घेतला, तसेच या समस्या सोडविण्यासाठी विशेष उपाययोजना सुचविण्यात आल्या. तत्कालीन परिस्थितीमुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांना ॲपलबी समितीच्या बहुतांश शिफारशी स्वीकारून सुधारणा करणे शक्य नव्हते परंतु समितीने सुचविलेल्या एका शिफारशीची मात्र तात्काळ अंमलबजावणी करण्यात आली. ती सूचना म्हणजे एका स्वतंत्र अशा प्रशासन संस्थेची निर्मिती करणे. या संस्थेद्वारे प्रशासनातील विविध समस्यांचा शोध घेऊन उपाययोजना केल्या जातील. यास अनुसरून 1954 मध्ये भारतीय लोक प्रशासन संस्थेची निर्मिती करण्यात आली. प्रशासकीय सुधारणा करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे प्रशासनात कार्यक्षमता, पारदर्शीपणा, नैतिकता वाढीस लावणे हा असतो. याच उद्देशाने प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित करून प्रशासन जनताभिमुख बनावे, प्रशासनावर सामान्य जनतेचे नियंत्रण असावेय या उद्देशाने लोकपाल विधेयकाची सातत्याने मागणी होत आली. याच अनुषंगाने 2005 मध्ये भारत



सरकारने माहिती अधिकार अधिनियम 2005 मंजूर केला. प्रशासनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या समित्या नेमल्या त्यांच्या शिफारशींचा अभ्यास करून ज्या काही उपाययोजना केल्या. त्या सर्वांमध्ये माहिती अधिकार कायदा 2005 हा अधिक महत्त्वाचा आहे. माहिती अधिकार कायदा 2005 नुसार भारतीय नागरिकांना खरे स्वातंत्र्य बहाल केले आहे. कारण या अधिकाराने नागरिकांना सार्वजनिक वित्ताचा योग्य पद्धतीने वापर होतो किंवा नाही हे जाणून घेण्याचा हक्क दिला आहे. एक प्रकारे नागरिकांचे प्रशासनावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यात आले आहे. म्हणून हा अधिकार सर्वश्रेष्ठ आहे. या माहिती अधिकारामुळे नागरिकांना प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार प्राप्त झाला. थोडक्यात माहिती अधिकार अधिनियम 2005 प्रशासनातील गैरवहारावर अंकुश ठेवण्याची महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, म्हणून या अधिकारास विशेष महत्त्व आहे.

सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असणारी कोणतीही माहिती एखाद्या नागरिकाला हवी असेल, तर ती तो मागू शकेल आणि ठराविक कालावधीत ती माहिती त्याला पुरविणे हे त्या सार्वजनिक प्राधिकरणावर कायद्यानुसार बंधनकारक आहे. हा या कायद्याचा गाभा आहे. नागरिकांचा ज्या ज्या सरकारी आणि निमसरकारी कार्यालयाशी, महामंडळाशी सार्वजनिक बँकांची किंवा नगरपालिका व महानगरपालिका यासारख्या स्थानिक संस्थांशी संबंध येतो, त्या प्रत्येक कार्यालयाचा, संस्थेचा आणि संघटनेचा सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेमध्ये समावेश होतो.

माहिती अधिकार कायदा 2005 मधील महत्त्वाच्या तरतुदी

1) या कायद्यामुळे प्रत्येक नागरिक वेगवेगळ्या खात्याच्या प्रशासकीय विभागाच्या फाइलची माहिती घेऊ न व पाहू शकेल.

2) आपल्या गाव परिसरात रस्त्यांची कामे इतर शासकीय बांधकामे यासारखी विकासाची कोणतीही कामे चाललेली असतील त्या कामांची आवश्यकतेनुसार नागरिक माहिती घेऊ शकतात.

3) ते आपल्या गावात तालुक्यात जिल्हास्तरावर होणारा शासकीय अन्नधान्य पुरवठा, रॉकेल पुरवठा, गॅस पुरवठा यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्या बद्दल माहिती घेऊ शकतात.

4) शासकीय कार्यालयातच नव्हे तर निमसरकारी कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानाचा लाभ घेणाऱ्या कंपन्या, शासनाचे अनुदान घेणाऱ्या शिक्षण संस्था, आयुक्ताकडे नोंदणी झालेल्या संस्था, ट्रस्ट, बँका अशा सर्व कार्यालयांची त्यांना माहिती घेता येईल.

5) ज्या कामासाठी सरकारी तिजोरीतील पैसा खर्च होतो, अशा कामांची

पाहणी प्रत्यक्ष जागेवर जाऊ न करता येईल. त्या कामासाठी वापरलेला माल व कामाचा दर्जा याचीही माहिती घेता येईल. एवढेच नाही तर एखाद्या कार्यालयाने किंवा संस्थेने खरेदी केलेल्या मालाची तपासणी सुद्धा नागरिकांना करता येईल.

6) शासनाचे अभिलेख, दस्तऐवज, लॉग बुक, हजेरी पत्र, परिपत्रके, काढलेले आदेश, अहवाल यांच्या नकला प्रति घेता येतील. कोणत्याही कार्यालयातील इलेक्ट्रॉनिक उपकरणावर साठविलेली ईमेल वरील माहिती घेता येईल.

7) माहिती अधिकार कक्षेत येणाऱ्या सर्व घटकांनी त्यांच्याकडील सर्व अभिलेखांची विषयावर विभागणी करून ती सूचीबद्ध पद्धतीने करून ठेवावयाची आहे. त्याचबरोबर जनतेला परस्पर माहिती घेण्यासाठी वेबसाईटवर सर्व माहिती उपलब्ध करून द्यावयाची आहे.

8) या कायद्यानुसार कोणताही अधिकारी नागरिकास तुम्ही माहिती का मागता अशी विचारणा करू शकत नाही.

माहिती अधिकार कायदा 2005 मधील वरील तरतुदीनुसार सामान्य नागरिकांचा प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचा हक्क अधिक सक्षम झालेला आहे. यामुळे कोणतीही प्रशासकीय व्यक्ती आपल्या कर्तव्यात कसूर करू शकणार नाही. या कायद्यातील तरतुदीचा योग्य पद्धतीने वापर करून नागरिकांच्या हक्कांचे उत्तम पद्धतीने संरक्षण होऊ शकते. म्हणूनच माहिती अधिकार हा प्रशासनावर योग्य नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे साधन आहे. एडमंड बर्क यांच्यामते, ''माहिती अधिकार 'कायद्याचे अधिराज्य' स्थापन करण्याचे अनिवार्य तत्व आहे. ॲटर्नी जनरल सोली यांच्या मते, ''भारताच्या राज्यघटनेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा तो एक भाग आहे''. पारदर्शकतेच्या अभावी भ्रष्टाचाराचा विस्तार होतो. माहिती अधिकार प्रशासनात खुलेपणा, उत्तरदायित्व व एकात्मिकता आणण्याचे साधन ठरू शकते. शासन हे जनतेच्या पैशाचे व्यवस्थापन करणे, शासन चालविण्यासाठी देण्यात आलेला पैशाचा विनियोग योग्य पद्धतीने होतो किंवा नाही, हे पाण्याचा संपूर्ण अधिकार जनतेस असावा लागतो. सरकार जनतेने निवडून दिलेले असते. शिवाय सरकार जनतेसाठी कार्य करीत असते. यामुळे शासनाच्या आर्थिक व्यवहारावर जनतेचे नियंत्रण असणे अनिवार्य ठरते. माहिती अधिकार हा शासनाच्या आर्थिक व्यवहारातील भ्रष्टाचाराला लगाम घालण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

माहिती अधिकाराचा प्रशासकीय यंत्रणेवर प्रभाव पडलेला आहे. परंतु या अधिकाराचा प्रभाव अभ्यासात असताना त्यास दोन बाजू दिसून येतात. एका बाजूला प्रशासनातील भ्रष्टाचार कमी करण्यास माहिती अधिकार उपयुक्त ठरत आहे. परंतु दुसऱ्या बाजूस नागरिकांमधूनच प्रशासकीय व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याच्या



या साधनाचा गैरवापर होताना दिसतो. म्हणजेच एखाद्या संस्थेमध्ये गैर व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असता त्याचा फायदा घेऊ न संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्याला ब्लॅकमेल करण्याचे प्रकारही होताना दिसतात.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani